चर्चा : १

# श्री. य. ज. महाबळ यांच्या 'परामर्शा' ची चिकित्सा

श्री. य. ज. महाबळ यांचा " अध्यात्म व अध्यात्मी " हा लेख " परामर्श " मध्ये (मे १९८८) प्रसिद्ध झाला. त्या लेखावरील माझ्या परीक्षणाचा (" परामर्श " ऑगस्ट १९८८) परामर्श (" परामर्श "-फेब्रुवारी १९८९) घेताना, श्री. महाबळ यांनी लेखाच्या शेवटच्या परिच्छेदात (पृष्ठ ८४) असे उद्गार काढले आहेत की " एखादाही अयोग्य शब्द हातातून निसटू नये याची मी दक्षता बाळगली आहे. तथापि ... तसं झालं असेल तर ... सर्वांची मी क्षमा मागतो. " या उद्गारात त्यांनी जे सौजन्य प्रकट केले आहे ते स्पृहणीय आहे. तसेच त्यांच्या दोन्ही लेखांत दिसून येणारी विज्ञान आणि बुद्धिवाद यावरील निष्ठा स्तुत्यच म्हटली पाहिजे त्यांच्या या निष्ठेचा आणि सौजन्याचा यत्किंचितही अनादर न करता, त्यांच्या परामर्शमधील तर्कदोषांना नाइलाजाने तर्कदोष म्हणून संबोधण्याचे कटू कर्तव्य मला करणे भाग आहे. त्यांच्या उपरोक्त सद्‌भावनांच्या तोडीचा वैचारिक रेखीवपणा आणि तार्किक काटेकोरपणा त्यांच्या या प्रदीर्घ परामर्शामध्ये आढळत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांच्या " लांबलेल्या " लेखाची तितकीच तपशीलवार चिकित्सा करावयाची म्हणजे अधिक दीर्घतर लेख लिहावा लागेल. तसे करणे सहज शक्य असले तरी प्रस्तुत संदर्भात प्रशस्त ठरणार नाही. या कारणास्तव, मी येथे थोडक्यातच काही यथोचित (Relevant) मुद्दे मांडू इच्छितो.

१. अध्यात्म हा विषयच असा आहे की, येथे प्रामाणिक मतभेदांना भरपूर वाव आहे. म्हणूनच या क्षेत्रात नाना सिद्धान्त, नाना दर्शने, नाना विचारप्रवाह

दृग्गोचर होतात. श्री. महाबळ यांनी आपल्या विज्ञाननिष्ठेच्या बळावर, आणि त्यांना अध्यात्मीजनांबाबत आलेल्या अप्रिय अनुभवांपायी, जे " अध्यात्म – विरोधक " विचार प्रकट केलेले आहेत त्यात जरी नावीन्य नसले तरी ते केव्हाही स्वागतार्हच आहेत. परंतु त्यांत मला जी समस्याग्रस्तता जाणवते ती मी माझ्या परीक्षणात ( परामर्श – ऑगस्ट १९८८) व्यक्त केली. त्या समस्याग्रस्ततेचे तर्कशुद्ध निराकरण श्री. महाबळ यांनी आपल्या ताज्या लेखात केलेले नाही, असे मला खेदाने म्हणावेसे वाटते.

२. एक गोष्ट श्री. महाबळ यांना आवर्जून सांगितली पाहिजे, ती ही की, अध्यात्माचा पूर्णतया अव्हेर करून, निखळ विज्ञानाची कास धरावी, ही त्यांची भूमिका " अध्यात्मविरोधी " असली तरी ती " अध्यात्मांतर्गत "च राहाते. ही गोष्ट जरी त्यांना स्वतःला रुचण्यासारखी नसली तरी ती तर्काला (Logic) मान्य होणारी आहे. अध्यात्माच्या क्षेत्राबाहेर पडून, अध्यात्मावर प्राणांतिक हल्ला चढविणे हे आजवर कुणालाच साधले नाही. साधणे शक्यच नाही. " अध्यात्म नको " असे म्हणणारे श्री. महाबळांसारखे विचारवंत, कळत नकळत, अध्यात्माच्याच छायेत वावरत असतात. अध्यात्माच्या प्रशस्तीइतकीच त्यांची निंदा हेदेखील एक आध्यात्मिक अथवा अध्यात्मविषयक वक्तव्य असते. जे सर्वस्वी अनाध्यात्मिक आहे त्याचा अध्यात्माला स्पर्श होणार कसा ? याचबरोबर हीही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, कोणत्याही विषयाबद्दलचे वक्तव्य त्या विषयाला न्याय देणारे असले पाहिजे. पण श्री. महाबळ यांची अध्यात्मावरील टीका जरी अध्यात्मविषयक असली तरी ती अध्यात्मावर अन्याय करणारी आहे; आणि ती अन्यायकारक आहे कारण ती अत्यल्प माहितीवर आधारलेली आहे.

३. श्री. महाबळ यांचा अध्यात्माशी विशेष जवळिकीचा परिचय नाही याची त्यांनी स्वतःच प्रामाणिक कबूली दिलेली आहे. (उदा. पृष्ठ ७९ लेखारंभी, तसेच पृष्ठ ८० परिच्छेद ३ मध्ये). त्यांच्या एकूणच लेखाचे सूक्ष्म परीक्षण केल्यास, त्यांचा अध्यात्माशी, विशेषतः आधुनिक अध्यात्मास उचित असलेल्या तर्कशुद्ध विचारसरणीशी, असलेला अल्प परिचय स्पष्टच दिसून येतो. (अ) अध्यात्म आणि अध्यात्मी (पृष्ठ ७९ परिच्छेद १) अध्यात्म आणि धर्म ( पृष्ठ ८१, परिच्छेद ५) अध्यात्म आणि तत्त्वज्ञान (पृष्ठ ८१, परिच्छेद ६), श्रद्धा आणि तर्क (Logic, Not Guesswork) (पृष्ठ ८१, परिच्छेद ६) या पदांच्या अर्थभेदांविषयीची त्यांची संभ्रमित वक्तव्ये, (आ) महाभारत, रसेल, विट्गेनस्टाइन, रॉय आदींचे आशयधूसर उल्लेख; ( पृष्ठ ८०–८१ ) (इ) " भक्त, ज्ञाता = वैज्ञानिक शोधक ", या समीकरणाच्या जोडीला बसविलेले " गूळ, साखर, मध, काकवी =

शर्करायुक्त पदार्थ ", हे समीकरण (पृष्ठ ८३) यासारख्या त्यांच्या लेखातल्या गोष्टी अध्यात्मयोग्य तार्किक बैठकीचा, आणि अध्यात्मविषयाशी यथायोग्य परिचयाचा, अभावच दर्शवितात. आधुनिक अध्यात्मविषयाशी सुयोग्य वैचारिक परिचय होण्यासाठी व्यापक अध्ययनाची, तार्किक सूक्ष्मतेची, विवेचनाच्या सखोलतेची आवश्यकता असते. अध्यात्माच्या साधकाला हे बौद्धिक प्रयास अटळ आहेत, हे मी श्री. महाबळ यांना नम्रतापूर्वक सांगू इच्छितो.

४. माझी भूमिका कोणती ? अध्यात्म समर्थकाची की अध्यात्मविरोधकाची ? असा श्री. महाबळ यांना प्रश्न पडला आहे. (पृष्ठ ८४, परिच्छेद १३) यावर मी इतकेच म्हणेन की, माझी भूमिका (सर्व जगद्वंद्य तत्त्ववेत्त्यांनी आज्ञापिलेली) " जिज्ञासू "ची आहे; " सर्वज्ञा "ची नाही. साधकाची आहे, " सिद्ध " पुरुषाची नाही. साहजिकच, श्री. महाबळ यांची काही ठिकाणची आव्हानात्मक भाषा माझ्या नजरेत उथळ आणि हास्यास्पद ठरते. उदाहरणार्थ, " आत्मा अमर आहे " हे वाक्य कसं सिद्ध करता येईल हे सांगावं (पृष्ठ ८२, परिच्छेद ८) अशी आव्हानात्मक शब्दयोजना तत्त्वज्ञानीय विवेचनात संयुक्तिक ठरत नाही. त्यापेक्षा, " आत्मा अमर आहे " हे विधान सिद्ध करण्याचा, तसेच हे विधान " निरर्थक ", सदैव असिद्ध राहाणारे आहे असेही दाखविण्याचा, आजवर जगातल्या कोणकोणत्या विचारवंतांनी कसकसा प्रयत्न केला ? या विधानात कोणकोणती प्रति–संविधाने (Paralogisms) अध्याहृत आहेत ? त्यातल्या पदांमध्ये कोणती अर्थधूसरता भरलेली आहे ? इत्यादी मनोरंजक माहिती पाश्चात्य तसेच पौर्वात्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासात सविस्तर आणि सुस्पष्टपणे दिलेली आहे. ती श्री. महाबळ यांनी स्वप्रयत्ने तेथे जाणून घेण्याची तसदी घ्यावी, अशी त्यांना माझी मित्रत्वाची विनंती आहे. कारण, तत्त्वज्ञानाच्या अध्ययनात स्वप्रयत्नांना पर्याय नसतो. अखेर, अध्यात्माच्या प्रांतात सत्याचा शोध ज्याचा त्यानेच करावयाचा असतो.

५. " बुद्धिवादास मान्य अशा विशुद्ध तार्किक भूमिकेवरूनही आध्यात्मिक समस्या हाताळता येतात. " या माझ्या विधानाबद्दल श्री. महाबळ यांनी साश्चर्य कुतुहल प्रकट केले आहे. (पृष्ठ ८२, परिच्छेद ८) त्यात त्यांच्या अध्यात्मविषयक वाङ्मयाच्या अध्ययनाच्या मर्यादाच दिसून येतात. उदाहरणार्थ, त्यांनीच उल्लेखिलेल्या " आत्मा अमर आहे " या विधानाकडे शुद्ध तार्किक, बुद्धिवादी दृष्टिकोनातून पाहाता येणार नाही काय ? त्यातल्या पदांचा नेमका अर्थ कोणता ? या विधानाचे तार्किक विश्लेषण कसे करता येईल ? त्यात सत्याचा अंश आहे काय ? असल्यास तो कितपत आहे ? नसल्यास तो का, कसा नाही ? या प्रश्नांची विचक्षणा बुद्धि-

वादी दृष्टिकोनातून करता येत नाही काय ? हे विधान "सिद्ध" केलेच पाहिजे, असा हट्ट म्हणजेच बुद्धिवाद होय, अशी जर श्री. महाबळ यांची समजूत असेल तर त्यांच्या बुद्धिवादाची कीवच करावी लागेल.

६. विज्ञानावर संपूर्ण भिस्त ठेवणारे श्री. महाबळ जेव्हा, जीवनाच्या मूल्य-विषयक, नीतीविषयक समस्या सोडविणे हे विज्ञानाचे काम नव्हे, असे म्हणतात (पृष्ठ ८२, परिच्छेद ७) तेव्हा ते स्वमुखानेच विज्ञानाच्या मर्यादा मान्य करतात; आणि विज्ञानाच्या सार्वभौमत्वाला स्वतःच सुरुंग लावतात. आपल्या कबुलीजबाबात कोणती तार्किक आपत्ती दडलेली आहे, याची त्यांना कल्पना नाही, हे उघड आहे ते म्हणतात, नैतिकतेच्या, मूल्यांच्या प्रश्नांचा ऊहापोह करावयास अन्य शास्त्रे. आहेत. पण ही गोष्ट तर माध्यमिक शाळेतल्या मुलांनाही माहीत आहे. तथापि येथे, शालेय विद्यार्थ्यांनाच काय, पण चांगल्या चांगल्या विचारवंतांनाही कोड्यात पाडणारी समस्या अशी की, नैतिक व अन्य मूल्यविषयक समस्यांचा विचार करणारे शास्त्र आणि बाह्य सृष्टीविषयी विचार करणारी पदार्थविज्ञानादी विज्ञानशास्त्रे यांच्या शिकवणीत जेव्हा लढा पडतो तेव्हा कोणत्या शास्त्रास शरण जावयाचे ? उदाहरणार्थ, नीतिशास्त्रातले "संकल्प-स्वातंत्र्य" आणि विज्ञानशास्त्रातला "कार्यकारणभाव" यांच्या मधला विरोध कसा दूर करावयाचा ? यांसारख्या समस्यांचा विचार, विज्ञानाला सर्वतोपरी शिरोधार्य मानणाऱ्या श्री. महाबळांनी शांत चित्ताने करणे अगत्याचे आहे.

शिवानंद सोसायटी,
विलेपार्ले – पूर्व, मुंबई–५७

– शं. हि. केळशीकर